International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.4 Mar-Apr- 2022

# कथाकार प्रा.माधव सरकुंडे यांच्या कथेतील अंधश्रध्देचे चित्रण

**श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव**
*पी.एच.डी संशोधक - पीपल्स कॉलेज नांदेड*
ईमेल :- chepurwargn27@gmail.com

**प्रस्तावना:-**

कथाकार प्रा.माधव सरकुंडे हे महाराष्ट्रातील विदर्भाच्या मातीतुन उदयास आलेले आदिवासी मराठी कथाकार, कांदबरीकार, लेखक, कवी, विचारवंत, व समाजसेवक असुन, आदिवासी साहित्यांच्या संदर्भात त्यांचा गाढा अभ्यास आहे. मराठी आदिवासी साहित्यामधील ते अग्रणी लेखक आहेत. ग्रामीण आदिवासींचे समाजजीवन, व्यक्तीचित्रण, आदिवासींच्या व्यथा, वेदना, प्रश्न, समस्या त्यांनी आपल्या वाङ्‌मयात चित्रित केलेल्या आहेत.कथाकार प्रा. माधव सरकुंडे यांचा ‘सर्वा’ हा पहिला कथासंग्रह आहे. हा कथासंग्रह १४ एप्रिल २००० मध्ये देवयानी प्रकाशन, यवतमाळ द्वारा प्रकाशित करण्यात आला. माधव सरकुंडे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत या कथा लिहिल्या आहेत. आदिवासीच्या जीवनातील दुःख, कष्ट, ग्रामीण आदिवासी राजकारण, दारिद्रय, व्यथा, निरक्षरता, शोषण, अंधश्रद्धा, सामाजिक प्रश्न, सामाजिक बांधिलकी, ग्रामीण आदिवासी माणसाची संवेदनशीलता, यासारखे विषय त्यांनी जीवंतपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ‘सर्वा’ हा माधव सरकुंडे यांचा पहिला कथासंग्रह त्यात त्यांनी 'सर्वा', 'डफडं', 'दीपस्तंभ', 'बरड', 'एस.टी', 'बैंगणदा', 'लुगडं', 'झड', 'बापू', 'वाट चुकलेली वस्ती' इत्यादी दहा कथा आहेत.

प्रा. माधव सरकुंडे यांचा ‘ताडमं’ हा दुसरा कथासंग्रह आहे. हा कथासंग्रह सन. २००१ मध्ये साकेत प्रकाशन, औरंगाबाद द्वारे प्रकाशित करण्यात आला. माधव सरकुंडे यांनी वऱ्हाडी बोलीत या कथा लिहिल्या आहेत. 'ताडमं' हा कथासंग्रह म्हणजे व्यथांचा संग्रह आहे.

'ताडमं' या कथासंग्रहात आदिवासीच्या जीवनातील दाहकता, व ग्रामीण समाजाशी संबध आलेल्या व्यावहारिक जीवनात आदिवासींची उपेक्षा कथाकार माधव सरकुंडे यांच्या लेखणीतून प्रतिबिंबित झालेली दिसते. 'ताडमं' या कथासंग्रहामध्ये एकुण नऊ कथा आहेत. त्यात 'ताडमं', 'मेदड', 'माय', 'तळं', 'जागल', 'काटा', 'गोठ्याच्या चुली', 'मी मेलोच नायी', 'करणी', इत्यादी कथा संग्रहित करून ग्रामीण आदिवासी लेखकांच्या पंरपंरेतील एक प्रमुख लेखक, कथाकार, आहेत. हे त्यांच्या कथेतील आदिवासी जीवनातील परिवर्तनाचा वेध व समस्या चित्रणाचे स्वरूप खालीलप्रमाणे पाहता येईल.

**(२). 'सर्वा' या कथासंग्रहामधील अंधश्रद्धा चित्रण:-**

ग्रामीण आदिवासी माणुस हा शहरी माणसापेक्षा हळवा, मायाळू व संवेदनशील असतो. कारण ग्रामीण आदिवासी जीवन सामुहिक स्वरूपाचे असते. प्रत्येक ग्रामीण आदिवासींमध्ये आपलेपणाची व सहकार्याची भावना असते. त्यामध्ये दया, माया, ममता, करूणा, समता आणि आपुलकी या मानवीय संवेदनशीलतेच्या सर्वच मुल्यांचा प्रकर्षाने प्रभाव जाणवू लागतो.अगदी याच संवेदनशीलतेचे दर्शन कथाकार माधव सरकुंडे यांनी 'सर्वा' या कथासंग्रहामध्ये अचूकपणे घडविले आहे.

'बरड' या कथेत समाजातील अंधश्रद्धा, चालीरिती, अनिष्ट प्रथा, जादूटोणा, ह्यावर जीवंतपणे चित्रण कथाकार माधव सरकुंडे यांनी केले असून, 'बरड' ही एक संवेदनशील अंधश्रद्धा विषयावरची कथा कथाकार माधव सरकुंडे यांनी मांडली आहे. 'बरड' ही कथा खंडु व गांवातील लोक यांच्याच भोवताली फिरत नसुन तर मानवीय संवेदनशीलतेचे दर्शन घडविते. खंडु गांवाकडे येतो. तेव्हा त्याला बरडाकडे बघून बरडावर घडलेली एक घटना आठवते.

खंडु त्यावेळी सातवीत शिकत असतो. गावात तिसरी पर्यन्तच शाळा असते. त्यानंतर च्या शिक्षणासाठी डोनगांवला जावे लागत असते. खंडु आणि त्याचे मित्र बिनधास्त ये-जा करत करत असतात, शाळेतून येताना या बरडाच्या रस्त्यावर खंडुचा मित्र रघु ठेच लागून पडतो. त्यानंतर तो वेड्यासारखा बडबडू लागतो. गांवात एकच बोंब होते, की रघुला बरडावरची जखीण लागली.

बरडावर दर हंगामात पारधी कुटुंब उतरत असते, एका साली एक गरोदर पारधीन अडते, तेव्हा तिचे बाळ जन्मते पण ती मरते. पारध्यांनी तिला तिथेच गाडलेले असते, लोकांचे म्हणणे असते की, तिच पारधीन जखीण होऊन रघुला लागलेली असते. एका रात्री रघु बरडावर पाय खोरून मरतो. या घटनेच्या आठवणी खंडुच्या मनात घर करून बसतात. व खंडुलाही रस्त्यावर सावली दिसल्याचा भास होतो. खंडु गांवाकड धावत येतो. खंडुची माय ओसरीवर भाकरी थापत असते. ती खंडुला भितऱ्या आवाजात विचारते, "खंडु, तुला काय झालं? इतक्या राती तु कसा आला.?" तेव्हा खंडु झालेला प्रकार सांगतो. मग पारीचा गलका ऐकुन शेजारपाजारची बाया माणस जमा होतात. किसनु वैद्य खंडुला मागुन - पुढुन निरखून पाहतो. वैद्य ओढ्याच्या धारेत डुबून बरडाकडे निघतो. लिंबाच झाड जवळ येताच वैद्य खेकसतो, "आणा ते साधन इकडं"

तितक्यात एक मानवी प्रतिकृती उठुन उभी होते. वैद्य मंत्र फेकणे सुरू करतो. तेव्हा वैद्य हिच जखीण आहे, म्हणून पटवून देतो. तेव्हा गर्दीत एकजण म्हणतो, "किसनु दा ह्ये जखीण नव्हयं". पण किसन्या वैद्य शेवटी ती

जखीणच आहे, म्हणून पटवून देतो. मग ते लोकांना पटते. व किसन्या वैद्दु म्हणतो, "वढा ईला गावाकं". वैद्याच्या सल्यानुसार ओढत फरपटत पिसीला गांवात आणले जाते. व खोलीत डांबून ठेवले जाते.

गावात जखीण धरल्याची बातमी पसरते. दहा वाजता पिसीला चावडीवर आणले जाते. व जाळे रोवून मध्यभागी घट्ट बांधले जाते. वैद्य काय करतो याकडे सर्वांचे लक्ष लागते. तेव्हा वैद्य चाबकाने पिसीला झोडने सुरू करतो.पिसी जीवांच्या आंकाताने किंचाळू लागते. ती ओरडून सांगते की, ती जखीण नाही. परंतू तिचे कोणी ऐकत नाही.

खंडु हा क्रुर प्रकार जवळुन पाहत असतो. खंडुला पिशींच्या डोळ्यात करूणा हात जोडून ऊभे दिसते. ती जखीण नाही अशी खात्री खंडुला होते. तो पुढ्यात येऊन ओरडतो. "थांबवा हा तमाशा! ती जखीण नाही". पण वैद्य खंडुचे ऐकत नाही. यावरून खंडुची संवेदनशील वृत्ती व माणुसकी दिसून येते. खंडुचे न ऐकता वैद्यपिसी ला मार सुरू करतो. जळत्या कोलताने तिचे सर्वांग लासवतो. शेवटी पिसी चित्कार फोडुन मरते. नंतर ज्या बरडावर पारधीन गाडली तिथचं पिशीला गाडलं जाते. पारधीनची जखीण नष्ट केली म्हणून, वैद्य गांवभर फुशारक्या मारतो. परंतू खंडुचे मन खट्ट होते. कारण पिसीचे चित्कार खंडुच्या मनातून निघत नसतात. "या बरडाच्या वस्तीच्या डोळयावर अंध विचारांची पट्टी इतकी कशी घट्ट ? शेजाऱ्यांचे दुःख पाहून रडणारे इथले मन इतके कसे क्रुर? या बरडापेक्षा शहरातले रेल्वेस्टेशन बरे..." असे विचार करून खंडुचे मन उबगते, खंडु आपल्या मायीला घेऊन शहराचा रस्ता धरतो. व बरडाला कायमचा नमस्कार करतो, इथे कथेचा शेवट होतो. एकंदरीत ग्रामीण आदिवासी अंधश्रध्देचे चित्रण प्रभावीपणे करण्यात कथाकार माधव सरकुंडे यशस्वी झालेले दिसतात.

उपरोक्त कथेबरोबरच 'डफडं' व 'वाट चुकलेली वस्ती' या कथेमध्ये ग्रामीण आदिवासी अंधश्रध्दा व संवेदनशीलतेच्या जाणीवा कथाकार माधव सरकुंडे यांनी प्रभावीपणे रेखाटलेल्या आहेत. ग्रामीण आदिवासी जीवनाचं अस्सल संवेदनशील रूप त्यांनी चित्रीत करून वाचकांच्या मनाला जागृत करण्यात कथाकार माधव सरकुंडे यशस्वी झाले आहेत.

**(३). 'ताडमं' या कथासंग्रहामधील अंधश्रद्धा चित्रण:-**

ग्रामीण आदिवासी जीवन सामुहिक स्वरूपाचे असते. प्रत्येक ग्रामीण व आदिवासींमध्ये आपलेपणाची व सहकार्याची भावना असते. त्यामध्ये दया, माया, ममता, करूणा, समता आणि आपुलकी या मानवीय संवेदनशीलतेच्या सर्वच मुल्यांचा प्रकर्षाने प्रभाव जाणवू लागतो. अगदी याच संवेदनशीलतेचे दर्शन कथाकार माधव सरकुंडे यांनी 'ताडमं' या कथासंग्रहामध्ये अचूकपणे घडविले आहे. सदरील कथासंग्रहामध्ये अंधश्रध्देचे चित्रण झालेले दिसते.

'गोट्याच्या चुली' या कथेत ग्रामीण आदिवासी भागातील अंधश्रद्धा व राजकारणाचे प्रभावी चित्रण कथाकार माधव सरकुंडे यांनी केले आहे. मरीबा कोळंबीला येतो. मरीबा हा मुळचा पंढरपूरकडचा असतो. पण पोटाच्या आकांतान सर्व मुलूख पायाखाली घालतो. व त्याची भटकंती सुरूच असते. त्याचे दोन्ही मुल तुळश्या व गणपत्या हे मरीमायीच्या नवसाच्या वटीतले असतात. मरीबाला कंदोरीचा नवस फेडायचा असतो. एके दिवशी तो पोरायला जवळ बोलावून घेतो व बजावुन सांगतो, "आर तुम्ही मायीच्या वटीतले व्हा, अन् उजुन मायीचं उसन फिटायच हाय". त्यावर मरीबाचे मुल प्रत्युत्तर देतात, "मग फेडु नं, तु".

मरीबा व त्याचे मुल कामाला लागतात. मरीबा व त्याची मुल खुप काम करतात. मरीबा दारू पित असतो, मात्र दुसऱ्या वडरायवानी बडबड न करता तो मुकाच पडून राहतो. गावांत दारूबंदी नसते. मात्र केव्हा - केव्हा गांवचा पाटील दारू पित असतो. पण त्याने बाहेरच्या लोकायला सक्त बंदी घातलेली असते. कारण एका भांडणात गावांत दोघा तिघानं मिळुन ऐकाला मारून टाकलेलं असते.

या घटनेपासून पाटलाला अदल घडलेली असते. दुसऱ्या दिवसापासून मरीबा व त्याची मुल नवसाची सारी तयारी करतात. दोन - चार दिवसांत सर्व तयारी होते. सर्व सोयऱ्याधायऱ्यांना मरीबा निरोप धाडतो. व नवसाचा दिवस उजाडतो. दुपारपर्यंत तयारी होते. पाहुणे सुध्दा येतात. मात्र नवसात भांडण सुरू होते. व मारामारी सुरू होते. या घटनेची बातमी पाटलाच्या कानी जाते. पाटील मरीबाला वाड्यावर बोलावून घेतो. मरीबा भीत-भीत वाड्यावर जातो. पाटील मरीबाला म्हणतो, "काय मऱ्या, काय सांगतलं व्हतं तुला". तेव्हा मरीबा पाटलाला खुप समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो.

पण पाटील काही एक ऐकत नाही. व पाटील मरीबाला आताच तुझा पाल गुंडाळून गांवच्या बाहेर निघ म्हणून आदेश देतो. त्यावर मरीबा पाटलाची माफी मागतो. व खुप विनवण्या करतो. पण पाटील मरीबाचे काहीही ऐकत नाही. तेव्हा मरीबा घरचा रस्ता धरतो. पाटील ह्या व्यक्तीरेखेतून ग्रामीण आदिवासी राजकारणाचे स्वरूप स्पष्ट होताना दिसून येते. मरीबा धडाधड पाल मोडतो. व सामानाचे गाठोडे बांधून त्यांची बायको, मुल चालू लागतात.

मरीबाची भटकंती आणखी सुरूच होते. ती कोठे संपणार याला अंत नसतो. कोळंबीची आठवण काढत तो दुःखी पाऊलानी चालू लागतो. "मरीबाचं घर मातर त्यांच्या डोळयातून थेंब - थेंब खाली गळत व्हतं". असा कथेचा शेवट कथाकार माधव सरकुंडे करतात.

एकंदरीत कथाकार माधव सरकुंडे यांनी 'गोट्याच्या चुली' या कथेद्वारे ग्रामीण आदिवासी जीवनाच्या वास्तव जाणिवाचा वेध घेतला असून, कथाकार माधव सरकुंडे यांनी ग्रामीण आदिवासी समाजातील अंधश्रद्धा किती गंभीर स्वरूपाचे असते. व त्या अंधश्रध्देने ग्रामीण आदिवासी लोकांचे जीवन कसे असते. यांचे अचुक चित्रण या कथेत केले आहे.

'मी मेलोच नायी' या कथेत मेळघाटातल्या कोरकू आदिवासीमधील अंधश्रद्धा, प्रथा, परंपरा, समजुती, भुतप्रेत ह्यावर चित्रण करणारी 'मी मेलोच नायी' ही एक अंधश्रध्दा विषयावरची कथा कथाकार माधव सरकुंडे यांनी मांडली आहे. 'मी मेलोच नायी' ही कथा मेळघाटातल्या कोलाम व कोरकू आदिवासींतील सनवाऱ्यांची आहे.

सनवाऱ्या कामानिमित्त राझीला न सांगता शहरात जातो. तेव्हा खुप दिवस झाले तरी सनवाऱ्या घरी परत येत नाही, एकेदिवशी रानात लटारामला एक प्रेत दिसतं ते सनवाऱ्याच प्रेत समजून त्याचा अत्यंविधी केला जातो. काही दिवसांनी सनवाऱ्या गांवात परत येतो. तेव्हा त्याला भुत म्हणून गांवातील लोक मारून पाठवतात. तेव्हा सनवाऱ्या अमरावती ला जाऊन हॉटेलात मालकाकडे काम करतो.

एकेदिवशी सनवाऱ्या पोलिसाकडे जातो. मोठे साहेब त्याला विचारतात, "तुझ्या वातल्या लोकांनी तुला का मारलं ?". ह्यावर सनवाऱ्या उत्तर देतो, "साहेब, मला ते भुत समजत्येत". सर्व विचारपुस करून, अखेर पोलिसांच्या साह्याने सनवाऱ्या परत गांवात येतो. सनवाऱ्या घरी जातो. मात्र त्याची बायको रांझी व गांवातले लोक त्याला कायम भुतच समजतात. सनवाऱ्या आपल्या बायकोला, पोरायला व गांवातल्या एका - एका माणसाला नरडा फाडू - फाडू सांगतो, "अरे भौ ! मी मेलोच नायी रे ! मव्हं मन्न खरं माना रे".

पण त्याच म्हणणे कोणीच ऐकत नाही. घरचे लोक शंकेने त्यांच्याकडे पाहतात. सनवाऱ्याला गांवात, घरात कोणीच बोलत नाहीत, जीवंत असून सनवाऱ्या मेल्यासारखा झालेला असतो. दुःखाचे अश्रु गाळत सनवाऱ्या जगत राहतो. व इथेच कथा संपते.

एकुणच 'मी मेलोच नायी' ही कथा आदिवासींमधील भुतप्रेत विश्वास, अंधश्रद्धा, जादूटोणा आदिचे वास्तव व संवेदनशील चित्र दर्शविते. 'मी मेलोच नायी' या अंधश्रध्देवरील संवेदनशील कथेची मांडणी सुध्दा आपल्या खास शैलीत कथाकार माधव सरकुंडे तितक्याच प्रभावीपणे करतात.

'करणी' या कथेत करणी, जादूटोणा, अंधश्रद्धा, ग्रामीण आदिवासी भागातील राजकारण, गांवातील वरिष्ठ वर्गाची दडपशाही, जातीयवाद, जुलूम, शोषण, अन्याय, अत्याचार, जबरदस्ती, व्यथा आदिचे वास्तवदर्शी व अंधश्रध्देवरील संवेदनशील चित्रण कथाकार माधव सरकुंडे यांनी 'करणी' या कथेत मांडले आहे.

देवकीला दिवस जातात ही बातमी कौतीकीला बायावाटे कळते. तेव्हा कौतीकी देवकीला माहेरी आणते. फकीऱ्या मांग हा देवकीचा पिता असतो. गांवभर तो करणीसाठी प्रसिद्ध असतो. त्याला लोक वैद्य मानत असतात. फकीऱ्या सुध्दा आपल्या जादुचा बडेजावपणा करत असतो. कधी - कधी संपुर्ण गांव मारतो म्हणून बोलत असतो. लोकायला सुध्दा त्याच म्हणणे खरे वाटत असते. त्याची पत्नी कौतीकी त्याला खुप समजावून सांगे पण तो उलट उत्तर

देई, "तु कामुन भीतु ये. काय करते गांव ? काय मव्ह कानोडं करते का? मह्या नुस्ती फुक मारली तं समंद गांव मारून टाकुन".

तेव्हा कौतीकी चवताळून पडते. डोळयात पाणी आणून नवऱ्याला समजावून सांगते. पण फकीऱ्या काही एक ऐकत नाही. एकेदिवशी फकीऱ्या बबन्याच्या गाभण गाईला गोटा मारतो. तेव्हा मायीसोबत देवकी शेतात जाते. तिथे ऊसामध्ये पाटलाचं मोठा मुलगा देवकीची इज्जत लुटतो, व तिला गप्प रहा म्हणून धमकावतो. ती गप्प राहते. असेच काही दिवस जातात.

बबन्या काही माणसे घेऊन फकीऱ्याच्या घरी येतो. व फकीऱ्याला मारहाण करतो. देवकी व कौतीकी मध्ये येतात, तेव्हा त्यांनाही मारहाण होते. मारहानीत देवकीच लेकरू पडते. तेव्हा कौतीकी न्याय मागण्यासाठी पाटलाकडे जाते. व सारा घडलेला प्रकार पाटलाला सांगते.

तोच पाटील कौतीकीवर वस्काळतो, "त्या बबन्यांन केलं ते ठिक केलं, तुमच्या कर्माचं फळ तुमाला मिळालं". तेव्हा कौतीकी पाटलास म्हणते, "पाटील, आमचा अन्याय आमच्या पदरात टाका". कौतीकी पाटलासमोर पदर पसरते, तेव्हा पाटील काही एक ऐकत नाही. व तिला उलट जवाब देतो. "उठ, येथे बोंबलत बसु नको". म्हणून तिला जाण्यास सांगतो. पाटलाचे शब्द कौतीकीच्या मनावर बुरूज पडल्यावानी आदळतात. तिच्या मस्तकात बार उडतो. ती डाळजच्या वट्यावरून धाडकन खाली पडते. व हात पाय झाडत कौतीकी तिथेच कडक होते. व इथेच कथा संपते.

एकुणच 'करणी' ह्या कथेत ग्रामीण आदिवासी भागातील अंधश्रद्धा, जादूटोणा, करणी, राजकारण, दडपशाही, जुलूम, जबरदस्ती, स्त्रियांचे होणारे शोषण आदिचे संवेदनशील चित्रण मांडण्यात कथाकार माधव सरकुंडे यशस्वी झाले आहेत.

**(४). समारोप :-**

वाडी, वस्ती, पाडयावरील माणस, ग्रामीण आदिवासी जीवन, समाज, संस्कृती, शेती, आणि निसर्ग यांच्या अनुषंगाने घडणाऱ्या घटना, प्रसंग, त्यातुन आकाराला येणारे लोकमानस या साऱ्यांतुन ग्रामीण आदिवासी जीवनानुभवाचे स्वरूप सिध्द होते. 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहामध्ये आदिवासी जीवनातील परिवर्तनाचा वेध व समस्या चित्रणाचे स्वरूप इत्यादी गोष्टीचे चित्रण कथाकार माधव सरकुंडे यांनी त्यांच्या कथेमध्ये केले आहे.

एकुणच माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहातील प्रसंग हा वाचकाला ग्रामीण आदिवासी जीवनातील परिवर्तनाचा वेध व समस्या चित्रणाचे स्वरूप, समाजातील प्रासंगिकतेची जाणीव करून देणारा आहे. व ग्रामीण आदिवासी जीवनानुभव समृध्द करणारा आहे.

**(५). संदर्भग्रंथ :-**

(१). माधव सरकुंडे, सर्वा, देवयानी प्रकाशन - यवतमाळ, १४ एप्रिल २०००.

(२). माधव सरकुंडे, ताडमं, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१.